# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिति

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 6 ]

दिनांक : 22/11/2017 वेळ : सकाळी 11.00 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर 2017 ची मासिक सभा बुधवार दिनांक 22/11/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. जावेद रमजान शेख | सदस्य |
| 4. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 5. | मा. वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 6. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 7. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 8. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 9. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 10. | मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | सदस्य |
| 11. | मा. कोमल दिपक मेवानी | सदस्या |

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. विशाल कांबळे - कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. अनिल शिंदे – प्र.कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री. सुभाष काळे, श्री. कोल्हे एल.पी., श्री.चंद्रकांत मुठाळ, श्री एम.आय. खोंद्रे, श्रीम. एल.एस.बाबर – उपअभियंता, डॉ. सतिश गोरे – मा. पशुवैदयकीय अधिकारी, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री कदम पी.जे. – लेखाधिकारी, श्रीम. साळुंके अस्मिता - कनिष्ठ अभियंता, स्था.उदयान, श्री. आर.एन. पिंगळे – सहा. पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या तसेच अधिकारी यांचे स्वागत केले. तदनंतर श्री. आर.के. लटपटे, प्रशासन अधिकारी हे अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये नुकतेच रुजू झाल्याने त्यांचे मा. शैलजाताई मोरे, उपमहापौर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी दि. 3/10/2017 व 10/10/2017 रोजीचा सभावृत्तांत कायम केल्याचे जाहीर करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

मा. सभापती यांचे संमतीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक 21 :- मा. उपमहापौर, शैलजा अविनाश मोरे व मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव प्राधिकरण-निगडी येथील टिळकचौक येथे लोकमान्य टिळक यांचा अर्धपुतळा काढून नव्याने पुर्णाकृती पुतळा उभारणे.

विषय क्रमांक 22 :- मा. जावेद शेख व मा. प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 14 मधील आकर्डी भाजीमंडईसमोरील सार्वजनिक शौचालय व मुतारी पाडून नवीन दुमजली शौचालय व मुतारी बांधणे.

विषय क्रमांक 23 :- मा. वैशाली काळभोर व जावेद शेख यांचा प्रस्ताव
प्रभाग क्रमांक 14 चे कार्यक्षेत्रामध्ये नागरीकांच्या सोयीसाठी व आवश्यकतेनुसार जुने प्रभागातील सर्व निविदा कामे करणे

विषय क्रमांक 24 :- मा. वैशाली काळभोर व जावेद शेख यांचा प्रस्ताव
मोहननगर येथील बालब्रम्हचारी सिध्दाजीआप्पा चौकातील फायबरची सार्वजनिक मुतारी इतरत्र स्थलांतरीत करुन त्याठिकाणी नवीन वीट बांधकाम, टाईल्स स्वरुपात पुरुष् व महिलांसाठी सार्वजनिक मुतारी बांधणे.

विषय क्रमांक 25 :- मा. शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे व मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव
चिंचवड स्टेशन येथील चौक, प्रभाग क्रमांक 19 मधील एल्प्रो चौक व चाफेकर चौक येथील रस्त्याच्या कामामुळे काढण्यात आलेले अगोदरचे नामफलक लावणे.

विषय क्रमांक 26 :- मा. शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे व मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव
आनंदनगर मधील पाण्याचे काम पुर्णपणे एमआयडीसीवर अवलंबून असल्याने त्यास बॅकअपसाठी नवीन टाकी बांधणे.

विषय क्रमांक 27 :- मा. केशव घोळवे, सभापती यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव
अ प्रभागातील कार्यक्षेत्रात नवीन प्रभाग क्रमांक 10,14,15 व 19 अंतर्गत जुने प्रभाग क्रमांक 8,10,14,15,16,17,18,19,25,26,27 चा समावेश होतो. जुन्या प्रभाग क्रमांकनुसार स्थापत्य विभागामार्फत निविदा काढणेत आलेल्या आहेत. सदयस्थितीत नवीन प्रभागानुसार विकास कामे करण्यात येत असल्याने नागरिकांच्या सोयीसाठी व आवश्यकतेनुसार जुने प्रभागातील सर्व निविदा कामे संबंधित नवीन प्रभागाच्या संपुर्ण कार्यक्षेत्रात करणेबाबत मान्यता देणे.

वरील प्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 110 | विषय क्रमांक 1
दिनांक 22/11/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. प्रमोद कुटे | अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 2/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील विवेकनगर येथील बंद व खराब अवस्थेत असलेल्या सर्व्हे नंबर 4310 मध्ये असणारे शौचालय काढणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक 1 चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 111 | विषय क्रमांक 2
दिनांक 22/11/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. प्रमोद कुटे | अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 2/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील आकुर्डी खंडोबामाळ पासून दळवीनगरकडे जाणा-या रस्त्यावर उभ्या असलेल्या मालती ट्रूर्सच्या गाडया हटविणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 112 विषय क्रमांक 3
दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. प्रमोद कुटे अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा दि. 2/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील सेंट उर्सुला शाळेलगत असणा-या साई पूजा बाग फेज-1 पासून मुंबई पुणे हायवेकडे जाणा-या रस्त्याला नो पार्कींग झोन करणेस तसेच सन्मा. सदस्य यांनी दिलेल्या उपसूचनेनुसार प्रतिभा कॉलेज रोड ते बालाजीचौक, जेम्स अटो समोरील रोड याठिकाणी नो पार्कींग झोन करणेस व विठ्ठल मंदीर ते सेंट उर्सुला शाळेकडील मार्ग एकेरी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 113 विषय क्रमांक 4
दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. राजू मिसाळ अनुमोदक : मा. अमित गावडे

संदर्भ :- सन्मा. सदस्य राजू मिसाळ यांचा दि. 2/11/2017 चा प्रस्ताव

प्राधिकरण से.नं. 25 येथील भगवान महावीर पथ स्पाईनरोडला जेथे मिळतो त्या चौकास [ लाल बहादूर शास्त्री चौकाच्या पुढील चौकास ] प.पू. प्रथमाचार्य चारित्र्य चक्रवर्ती 108 शांतीसागरजी महाराज चौक असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 114 विषय क्रमांक 5
दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. उपमहापौर शैलजा मोरे यांचा दि. 13/11/2017 चा प्रस्ताव

प्राधिकरण सेक्टर नंबर 25 मधील अ क्षेत्रीय कार्यालयाच्या मागील रस्त्याला दिल्ली स्वाद व नॅचरल आईसक्रीम समोरील चौकाचे संत जलाराम चौक असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 115 विषय क्रमांक 6
दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

**प्रभाग क्रमांक 10 मधील शांतीनिकेतन सोसायटी ते थरमॅक्स चौक रस्त्याच्या बाजूला लॅंडस्केपिंग करुन चौक सुशोभित करणेस मान्यता** देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 116 | विषय क्रमांक 7
दिनांक 22/11/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

**प्रभाग क्रमांक 10 मधील सीएनजी पंपासमोरील रस्त्याच्या मोकळया जागेमध्ये लॅंडस्केपिंग करुन चौक सुशोभित करणेस मान्यता** देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 117 | विषय क्रमांक 8
दिनांक 22/11/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

**प्रभाग क्रमांक 10 मधील एचडीएफसी कॉलनी ते केएसबी चौक रस्त्यालगत लॅंडस्केपिंग करुन चौक सुशोभित करणेस मान्यता** देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 118 | विषय क्रमांक 9
दिनांक 22/11/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

**अ प्रभाग हद्दीमधील फेरीवाल्यांचे पुर्वी केलेले सन 2012 चे सर्व्हेक्षण हे पुर्णपणे बोगस असल्याने व वास्तववादी नसल्याने पुर्न:सर्व्हेक्षण करणेस मान्यता** देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 119 | विषय क्रमांक 10
दिनांक 22/11/2017 | विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. अनुराधा गोरखे | अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

**अ प्रभागा**मधील सर्व गार्डन्स व बर्डव्हॅलीमध्ये म्युझिक सिस्टीम बसविणेस तसेच त्यामध्ये **सकाळी व सायंकाळी** भक्तीगिते व भावगिते सुरु करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 120
दिनांक 22/11/2017
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 11
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

**प्रभाग क्रमांक 10 मधील सम्राट चौकामधील डी.पी. मुख्य व गर्दीच्या रस्त्यामध्येच येत आहे, त्यांमुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदरचा डी.पी. स्थलांतरीत करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 121
दिनांक 22/11/2017
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 12
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील हॉटेल की हॉटेल सुप्रीम या लोकेशनजवळ विदयार्थी व महिला भगिनी व ज्येष्ठ नागरिकांच्या बस प्रवास करणेसाठीच्या सुलभतेसाठी नव्याने बस थांबा बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

**ठराव क्रमांक 122**
**दिनांक 22/11/2017**
**सुचक: मा. अनुराधा गोरखे**

विषय क्रमांक 13
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील मोरवाडी ते चिखली या रस्त्याच्या बाजूला सम्राट चौक येथे एक बसथांबा बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 123
दिनांक 22/11/2017
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 14
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील राजर्षी शाहू उदयान , शिवशाहू उदयान येथे नागरिकांचे आरोग्य आनंदी व उत्तम राहण्यासाठी हास्ययोग, हास्यकल्लोळ असे उपक्रम दैनंदिन सुरु करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 124 विषय क्रमांक 15

दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील संभाजीनगर व शाहूनगर कुंडी विरहीत करुन घनकच-याचे व्यवस्थापन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 125 विषय क्रमांक 16

दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शिवशंभो फौडेशन शाहूनगर येथे पुर्वीच्या वाचनालयाची दुरावस्था झालेली आहे तरी तेथेच नवीन वाचनालय बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 126 विषय क्रमांक 17

दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथील क्रिडांगणामध्ये सध्या धुळखात पडलेले वाचनालय बंद करुन महिलाभगिनींच्या सक्षमीकरणासाठी बचतगटाचे प्रशिक्षण, मार्गदर्शन व ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रमासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 127 विषय क्रमांक 18

दिनांक 22/11/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील संभाजीनगर येथील मनपाच्या दवाखान्यामधील ओपीडीमध्ये गोळया व औषधे उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी त्याठिकाणी गोळया व औषधांची त्वरीत सोय करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 128
दिनांक 22/11/2017
सुचकः मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 19
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग अध्यक्षांच्या कक्षामध्ये युवक व महिलाभगिनी व ज्येष्ठ नागरिक त्यांच्या समस्यांचे व प्रश्नांचे निराकरण करणेसाठी तसेच मनपाच्या कामांनिमित्त येत असल्याने दररोज गर्दी होत असते तरी त्यांच्या चहापान व बिस्कींटांची सोय करणेकामी आर्थिक तरतूद करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 129
दिनांक 22/11/2017
सुचकः मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 20
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 18/11/2017 चा प्रस्ताव

शहरामध्ये डेंगीची साथ असल्यामुळे अ प्रभाग हद्दीमध्ये नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने डेंगीमुक्त प्रभाग करण्यासाठीची सर्व यंत्रणा [ फॉगींग, औषधफवारणी कार्यस्थळ तपासणी करणे ] विशेष बाब म्हणून कार्यान्वीत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

त्यानंतर ऐनवेळचे विषय खालीलप्रमाणे मंजुर करणेत आले.

ठराव क्रमांक 130
दिनांक 22/11/2017
सुचकः मा.शैलजा मोरे

विषय क्रमांक 21
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. उपमहापौर शैलजा मोरे यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव

निगडी प्राधिकरण येथे टिळक चौक असून सदर चौकात लोकमान्य टिळकांचा अर्धपुतळा आहे. सदरचा पुतळा व त्यावरील मेघडंबरी खूप जुनी असून धोकादायक स्थितीत उभी आहे. लोकमान्य टिळकांचा सदयस्थितीतील पुतळा चौकातील रहदारीमध्ये दिसून येत नाही. सदर राष्ट्रपुरुषाच्या पुतळयाचे सन्मानपुर्वक नुतनीकरण करुन पुर्णाकृती पुतळा व त्या सभोवताली आकर्षक मेघडंबरी उभारणेची या परिसरातील नागरीकांची इच्छा आहे.

तरी निगडी -प्राधिकरणामधील टिळक चौकातील लोकमान्य टिळकांचा जुना अर्धपुतळा काढून नव्याने पुर्णाकृती पुतळा व आकर्षक मेघडंबरी उभारणेस व त्याकरीता आर्किटेक्ट व महानगर पालिकेची पुतळा समिती गठीत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 131
दिनांक 22/11/2017
सुचकः मा.जावेद शेख

विषय क्रमांक 22
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दि. 21/11/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील आकुर्डी भाजीमंडई समोरील सार्वजनिक शौचालय व मुतारीची अत्यंत दुरावस्था झाली आहे. तसेच वापरणा-या नागरिकांच्या संख्येत वाढ झाल्याने ती अपुरी पडत आहे. सदर शौचालय अतिशय जुने असून मोडकळीस आल्याने चारही बाजूस दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे. तरी सदर शौचालय व मुतारी पाडून तेथे नवीन दुमजली शौचालय व तेथेच नवीन मुतारी बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 132
दिनांक 22/11/2017
सुचक: मा.वैशाली काळभोर

विषय क्रमांक 23
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ :- सन्मा. सदस्या वैशाली काळभोर यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव

प्रभागातील नवीन प्रभाग क्रमांक 14 [ आकुर्डी काळभोरनगर रामनगर चिंचवडस्टेशन ] अंतर्गत जुने प्रभाग क्रमांक 10,15,16, 25 व 26 चा समावेश होतो. जुन्या प्रभाग क्रमांकनुसार स्थापत्य् विभागामार्फत निविदा काढण्यात आलेली आहेत. सदयस्थितीत नवीन प्रभाग क्रमांक 14 नुसार विकास कामे करण्यात येत असल्याने नागरिकांच्या सोयीसाठी व आवश्यकतेनुसार जुने प्रभागातील सर्व निविदा कामे नवीन प्रभाग क्रमांक 14 चे कार्यक्षेत्रामध्ये करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 133
दिनांक 22/11/2017
सुचक: मा.वैशाली काळभोर

विषय क्रमांक 24
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. जावेद शेख

संदर्भ :- सन्मा. सदस्या वैशाली काळभोर यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव

मोहननगर येथील बालब्रम्हचारी सिध्दाजीआप्पा चौकातील सार्वजनिक मुतारी पुर्णपणे खराब झाली असून ती फायबरची असल्याने दुरुस्त करता येत नाही. तरी सदर फायबरची मुतारी प्रभागामध्ये आवश्यकतेनुसार इतरत्र स्थलांतरीत करणेस व त्याठिकाणी नवीन वीट बांधकाम, टाईल्स स्वरुपात पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र कक्ष असलेली सार्वजनिक मुतारी नागरिकांच्या सोयीसाठी बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 134
दिनांक 22/11/2017
सुचक: मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र मोरे

विषय क्रमांक 25
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. कोमल मेवानी

संदर्भ :- सन्मा. सदस्य शैलेश ऊर्फ शैलेंद्र मोरे यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव

चिंचवड स्टेशन येथील चौकात अगोदर असलेला फलक रस्त्याच्या कामामुळे काढण्यात आला तो असलेल्या नावाने **फकिराभाई पानसरे चौक** या नावाने लावणेस तसेच प्रभाग क्रमांक 19 मधील एल्प्रो चौकाचे दुरुस्तीकरणामुळे काढण्यात आलेला फलक **अहिंसा चौक्** परत नवीन बनवून लावणेस तसेच चाफेकर चौक पुलाच्या सुरुवातीस डाव्या बाजूस असलेला फलक पुलाचे काम सुरु असताना काढण्यात आला होता. तरी त्यास नाव असलेला **भगवान महावीर स्वामी मार्ग** जैन मंदीराकडे असलेला फलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 135 — विषय क्रमांक 26
दिनांक 22/11/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचकः मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र मोरे — अनुमोदक : मा. कोमल मेवानी

संदर्भ :- सन्मा. सदस्य शैलेश ऊर्फ शैलेंद्र मोरे यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव

आनंदनगर मधील पाण्याचे काम पुर्णपणे एमआयडीसीवर अवलंबून असल्याने त्यास बॅकअपसाठी नवीन टाकी बांधणेकामी पालिकेची जेथे जागा उपलब्ध असेल तेथे बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 136 — विषय क्रमांक 27
दिनांक 22/11/2017 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचकः मा. अनुराधा गोरखे — अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/11/2017 चा प्रस्ताव

अ प्रभागातील कार्यक्षेत्रात नवीन प्रभाग क्रमांक 10,14,15 व 19 अंतर्गत जुने प्रभाग क्रमांक 8,10,14,15,16,17,18,19,25,26,27 चा समावेश होतो. जुन्या प्रभाग क्रमांकनुसार स्थापत्य विभागामार्फत निविदा काढणेत आलेल्या आहेत. सदयस्थितीत नवीन प्रभागानुसार विकास कामे करण्यात येत असल्याने नागरिकांच्या सोयीसाठी व आवश्यकतेनुसार जुने प्रभागातील सर्व निविदा कामे संबंधित नवीन प्रभागाच्या संपुर्ण कार्यक्षेत्रात करणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज झालेनंतर उपस्थित सन्मा. सदस्य यांनी त्यांचे वॉर्डमधील/प्रभागामधील अडी-अडींचणीबाबत खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने मा. सभापती यांनी सुचना सर्व संबंधित अधिकारी यांना पुढील प्रमाणे सुचना/आदेश दिले.

- अ क्षेत्रीय कार्यालयाचे संपुर्ण कार्यक्षेत्राची वाहतुक विभागामार्फत् पाहणी करुन रहदारीस अडथळा होत असेल अशी ठिकाणे [ उदा. रस्ते, चौक इत्यादी ] नो पार्कींग झोन करणेची कार्यवाही लवकरात लवकर करणेत यावी. तसेच क्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे संबंधित अधिकारी यांनी चारही वॉर्डमधील सर्व फूटपाथवरील अतिक्रमणे काढून नागरिकांच्या सोयीसाठी सर्व फूटपाथ खुले करणेची कार्यवाही पुढील एक आठवडयाचे आत

करावी. तथापि, सदर कार्यवाहीचे अनुषंगाने चार ही वॉर्डामधील कोणीही सदस्य अथवा पदाधिकारी यांनी वाहतुक विभागाचे/अतिक्रमण विभागाचे कामकाजामध्ये हस्तक्षेप करु नये

- उपस्थित सन्मा . सदस्यांनी काही भागामध्ये माजी नगरसदस्यांच्या नावाचे बोर्ड अद्याप काढले नसल्याचा मुद्दा उपस्थित केला असल्याने स्थापत्य विभाग व संबंधित अधिकारी यांचेमार्फत अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सर्व वॉर्डामधील माजी नगरसदस्यांचे नावाचे बोर्ड [पदाधिकारी वगळून ] काढून घेण्याची कार्यवाही पुढील चार दिवसांचे आत करावी. तसेच पुढील मिटींगमध्ये सदरचा मुद्दा पुन्हा उपस्थित करण्याची वेळ येणार याची दक्षता सर्व संबंधित अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदस्यांचे मागणीनुसार सदयस्थितीमध्ये सदस्यांचे नावाचे बोर्ड एका standard size व एकाच design मध्ये करणेत यावेत.
- मा. उपमहापौर, शैलजाताई मोरे यांनी नाल्यांची साफसफाई वर्षातून फक्त एकदाच पावसाळयापुर्वी केली जाते. परंतु आरोग्य् विभागामार्फत अधूनमधून परिसरातील सर्व नाले साफ करणेची दक्षता संबंधित विभागाने घ्यावी. तसेच वॉर्डामध्ये मोकाट जनावरे, कुत्री, डुकरे यांचा खूपच सुळसुळाट झाला आहे. याबाबत पशुवैदयकीय विभागाने तातडीने दखल घ्यावी.
- मा. सभापती यांनी सर्वच् वॉर्डामध्ये समक्ष पाहणी करुन डुकरे पाळणा-या मालकावर फौजदारी गुन्हे दाखल करणेची कार्यवाही करावी. तसेच पशुवैदयकीय विभागामार्फत पुढील एक आठवडयाचे schedule करुन प्रभागातील चारही वॉर्डामधील मोकाट जनावरे, कुत्री रात्री अथवा पहाटेच्या वेळी पकडण्याची कार्यवाही करावी. Schedule नुसार ज्या भागामध्ये कार्यवाही करणार आहे त्याची पुर्वकल्पना संबंधित नगरसदस्यांना देण्यात यावी.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/1310/2017
दिनांक 24/11/2017
4/12

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति.

सर्व संबंधित